# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## प्रायश्चित्तकाळातील तिसरा रविवार

## सकाळची प्रार्थना

*महत्वाची सूचना ः ख्रिस्तसभेची प्रार्थना किंवा ब्रिविअरी प्रार्थना हा प्रकार खूप प्राचीन आहे. मठवासी धर्मगुरूंकडून आलेली ही प्रार्थना चर्च आपली अधिकृत प्रार्थना म्हणून मानते. सदर प्रार्थनेचं एक महत्वाचं वैशिष्टय म्हणजे ही संपूर्ण प्रार्थना बायबलवर आधारीत आहे. धर्मगुरू धर्मभगिनी तसेच अनेक प्रांपचिक ही प्रार्थना नित्यनेमाने करीत असतात. आपल्या संपूर्ण कुटुंबाला एकत्रित करून आपण ही प्रार्थना करावी. चिंतन व गरजेनुसार विनंत्या ह्या प्रार्थनेमध्ये अंतर्भूत करता येतील. ख्रिस्त सभेची ही महत्वाची प्रार्थना करण्यापूर्वी घरात प्रार्थनामय वातावरण तयार करा. टिव्ही मोबाईल बंद करा, घरातल्या राजपिठासमोर मेणबत्त्या लावा, प्रार्थनेला योग्य असे कपडे करा व आपल्या कुटुंबासाठी हा एक भक्तीमय सोहळा बनवा. ख्रिस्तसभेची ही महत्वाची प्रार्थना आपणांस सतत प्रेरणा देत राहो.*

चरण: प्रभो, आमचे ओठ उघड.

प्रतिसाद: आणि आम्ही तुझ्या नामाचे स्तवन करू.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत:** आमच्यासाठी प्रभू ख्रिस्तावर मोहाचे प्रसंग आले आणि त्यांनी आम्हासाठी दु:ख भोगले. चला, आपण त्याचा जयजयकार करू.

पर्यायी: अहो, आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकाल, तर आपली अंत:करणे कठीण करू नका.

**स्तोत्र २४**

पृथ्वी व तिच्यावरील सर्व काही परमेश्वराचे आहे;
जग व त्यात राहणारे परमेश्वराचे आहेत.
कारण त्यानेच सागरावर तिचा पाया घातला,
त्यानेच जलप्रवाहांवर तिला स्थिर केले. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

परमेश्वराच्या डोंगरावर कोण चढेल?
त्याच्या पवित्र स्थानात कोण उभा राहील?

ज्याचे हात स्वच्छ आहेत आणि ज्याचे मन शुद्ध आहे,
जो आपले चित्त असत्याकडे लावीत नाही,
व कपटाने शपथ वाहत नाही तो. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**त्याला** परमेश्वरापासून आशीर्वाद मिळेल,
आपल्या उद्धारक देवाच्या हातून तो नीतिमान ठरेल.
त्याला शरण जाणारे हेच लोक होत;
हे याकोबाच्या देवा,
तुझ्या  दर्शनासाठी उत्सुक असलेले ते हेच. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**अहो** वेशींनो, आपल्या कमानी उंच करा;
पुरातन द्वारांनो, उंच व्हा;
म्हणजे प्रतापशाली राजा आत येईल. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**हा** प्रतापशाली राजा कोण?
बलवान व पराक्रमी परमेश्वर,
युद्धांत पराक्रमी परमेश्वर तोच, आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**अहो** वेशींनो, आपल्या कमानी उंच करा;
पुरातन द्वारांनो, उंच व्हा;
म्हणजे प्रतापशाली राजा आत येईल. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**हा** प्रतापशाली राजा कोण?
सेनाधीश परमेश्वर,
हाच प्रतापशाली राजा. आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत

**पिता**, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**पिता**, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**आमंत्रण स्तोत्र प्रतिगीत:** आमच्यासाठी प्रभू ख्रिस्तावर मोहाचे प्रसंग आले आणि त्यांनी आम्हासाठी दु:ख भोगले. चला, आपण त्याचा जयजयकार करू.

पर्यायी: अहो, आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकाल, तर आपली अंत:करणे कठीण करू नका.

गीत ः प्रायश्चित्त काळातील गीत

प्रतिगीत १: खरोखर तुझे निर्बंध विश्वसनीय आहेत. ते समुद्रात दडलेल्या गूढ गोष्टींपेक्षा अद्‌भुत आहेत.

स्तोत्र ९३

परमेश्वर राज्य करितो,
त्याने ऐश्वर्याचा पेहराव घातला आहे;
परमेश्वराने सामर्थ्याचा पेहराव घालून कंबर कसली आहे;

म्हणून पृथ्वी स्थिर आहे,
डळमळली नाही.
तुझे राजासन पुरातन कालापासून स्थिर आहे;
तू अनादिकालापासून आहेस.

हे परमेश्वरा, नद्यांनी कल्लोळ केला आहे,
महानाद केला आहे;
नद्यांनी आपल्या लाटांनी गर्जना केली आहे.
विपुल जलांच्या, महासागराच्या प्रचंड लाटांच्या गर्जनेहून
उच्च स्थानी असलेला परमेश्वर प्रतापशाली आहे.

तुझे निर्बंध अभंग आहेत;
हे परमेश्वरा, तुझ्या घराला पावित्र्य सदैव शोभते.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: खरोखर तुझे निर्बंध विश्वसनीय आहेत. ते समुद्रात दडलेल्या गूढ गोष्टींपेक्षा अद्‌भुत आहेत.

*****

प्रतिगीत २: झऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

काव्य - तीन युवकांचे गीत: ३५ - ६८

प्रभूच्या साऱ्या कृत्यांनो, त्याचा धन्यवाद गा,
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
तारामंडळांनो प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

प्रभूच्या दूतांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
मेघातील जलांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
साऱ्या सत्तांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

हे सूर्य आणि चंद्र, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
आकाशातील ताऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
जलधारांनो आणि दवबिंदूनो, प्रभूचा धन्यवाद गा.
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

साऱ्या वायुंनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
अग्नी आणि उष्णते, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हिवाळयातील थंडी आणि उन्हाळयातील उष्णते, प्रभूचा धन्यवाद गा,
त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

हिम आणि दवबिंदूनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
बर्फ आणि थंडी, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
ओसकणांनो आणि हिमांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

रात्रींनो आणि दिवसांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
उजेड आणि अंधार, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
मेघांनो आणि विजांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

पृथ्वीने प्रभूचा धन्यवाद गावा, त्याची स्तवने गावी
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करावी.

पर्वतांनो आणि टेकडयांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पृथ्वीवर वाढणाऱ्या सर्व वनस्पतींनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
अहो झऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

सागरांनो आणि नद्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
देवमाशांनो आणि जलचरांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हवेत संचारणाऱ्या सर्व पक्षांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पशूंनो आणि गुरांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

अहो मानवपुत्रांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

अहो इस्त्राएली लोकांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
प्रभूच्या पुरोहितांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
प्रभूच्या सेवकांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

नीतिमानांच्या आत्म्यांनो आणि जीवांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
पवित्र व विनयशील जनांनो, प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.
हन्नानिया, अझारिया आणि मिखाएल प्रभूचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

प्रभू चांगला आहे म्हणून त्याचे आभार माना
कारण त्याची दया सनातन आहे.
प्रभू देवाधिदेव यांची उपासना करणाऱ्यांनो,
त्याचा धन्यवाद गा, त्याची स्तवने गा
आणि त्याचे आभार माना कारण त्याची दया सनातन आहे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याची स्तुती करू या.
तुझाच सर्वोच्च गौरव आणि स्तुती सदासर्वकाळ होवो.
हे प्रभू, स्वर्गात तू धन्यवादित होवो.
तुझाच सर्वोच्च गौरव आणि स्तुती सदासर्वकाळ होवो.

प्रतिगीत २: झऱ्यांनो, प्रभूचा धन्यवाद गा. त्याची स्तवने गा आणि सर्वकाळ त्याची प्रशंसा करा.

*****

प्रतिगीत ३: पृथ्वीवरील सर्व राजांनो आणि लोकांनो, देवाचे स्तवन करा.

स्तोत्र १४८

परमेशाचे स्तवन करा.
आकाशातून परमेश्वराचे स्तवन करा;
उर्ध्वलोकी त्याचे स्तवन करा.
अहो त्याच्या दिव्यदूतांनो, त्याचे स्तवन करा;

अहो सूर्यचंद्रहो, त्याचे स्तवन करा;
सर्व प्रकाशमय ताऱ्यांनो, त्याचे स्तवन करा.
आकाशावरील आकाशांनो,
आकाशावरील जलांनो त्याचे स्तवन करा.

ती परमेश्वराच्या नावाचे स्तवन करोत,
कारण त्याने आज्ञा केली व ती निर्माण झाली.
त्याने ती सर्वकाळासाठी स्थापिली;
त्याने नियम लावून दिला
त्याचे उल्लंघन कोणी करणार नाही.

पृथ्वीवरून परमेश्वराचे स्तवन करा,
मोठेमोठे जलचर व सर्व जलाशय

अग्नी, गारा, हिम व धुके,
त्याची आज्ञा सिद्धीस नेणारे वादळ,

पर्वत व सर्व टेकडया,
फळझाडे व सर्व गंधसरू,
वनपशू व सर्व ग्रामपशू,
सरपटणारे प्राणी व उडणारे पक्षी,

पृथ्वीवरील राजे व सर्व प्रजा,
अधिपती व पृथ्वीवरील सर्व न्यायधीश,
कुमार व कुमारी, वृद्ध व तरूण

ही सगळी परमेश्वराच्या नावाचे स्तवन करोत;
कारण केवळ त्याचेच नाव उच्च आहे;
त्याचे ऐश्वर्य पृथ्वीच्या व आकाशाच्या वर आहे.

आणि त्याने आपल्या लोकांचा पुन्हा उत्कर्ष केला आहे;
तो आपल्या सर्व भक्तांना,
त्याच्याजवळ असलेल्या लोकांना
म्हणजे इस्त्राएलाच्या संततीला स्तुतीपात्र आहे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३:** पृथ्वीवरील सर्व राजांनो आणि लोकांनो, देवाचे स्तवन करा.

**शास्त्रवाचन** — **नहेम्या ८: ९ - १०**

मग नहेम्या तिर्शाथा (प्रांताधिपती), एज्रा, याजक, शास्त्री आणि लोकांस शिकविणारे लेवी हे सर्व लोकांस म्हणाले, हा दिवस तुमचा देव परमेश्वर याच्याप्रीत्यर्थ पवित्र आहे, तर शोक करू नका; रडू नका; कारण ते लोक नियमशास्त्रातील वचने ऐकून रडू लागले होते. तेव्हा त्याने त्यांस सांगितले, जा, मिष्टान्नाचे सेवन करा; गोडगोड पेये प्या व ज्यांच्या घरी काही तयार नसेल त्यांस वाढून पाठवा; कारण आजचा दिवस परमेश्वराप्रीत्यर्थ पवित्र आहे; तुम्ही उदास राहू नका; कारण परमेश्वराविषयीचा जो आनंद तोच तुमचा आश्रयदुर्ग होय.

## लघु प्रतिसाद

प्रतिसाद: हे खिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

प्रतिसाद: हे खिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

चरण: आम्ही पाप करून तुला दुखविले आहे.

प्रतिसाद: हे खिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.

प्रतिसाद: हे खिस्ता, जिवंत देवाच्या पुत्रा, आम्हावर दया कर.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** प्रभू म्हणतो, 'हे मंदिर मोडून टाका, मी ते तीन दिवसांत उभारीन. तो तर आपल्या शरीररूपी मंदिराविषयी बोलत होता'.

जखऱ्याचे स्तोत्र

इस्राएलचा देव प्रभू धन्यवादित असो,
कारण त्याने आपल्या लोकांची भेट घेऊन
त्यांची 'खंडणी भरून सुटका' केली आहे;

आणि आपल्यासाठी त्याने आपला दास 'दावीद'
ह्याच्या घराण्यात 'बलवान् उद्धारक प्रस्थापित केला आहे;
हे त्याने युगाच्या प्रारंभापासून
आपल्या पवित्र संदेष्टयांच्या मुखाद्वारे सांगितले होते;'

म्हणजे आपल्या 'शत्रूंच्या' व आपला 'द्वेष करणाऱ्या'
सर्वांच्या 'हातून' सुटका करावी;
अशासाठी की, 'आपल्या पूर्वजांवर' त्याने 'दया' करावी.
आणि त्यानें 'आपला' पवित्र 'करार' म्हणजे जी शपथ
आपला पूर्वज 'अब्राहाम ह्याच्याशी त्याने वाहिली', ती 'स्मरावी',

ती अशी की, तुम्ही आपल्या शत्रूंच्या हातून सुटून
माझ्यासमोर पवित्रतेने व नीतीने
आयुष्यभर माझी सेवा निर्भयपणे कराल, असे मी करीन.

आणि हे बाळका, तुला परात्पराचा संदेष्टा म्हणतील,
कारण 'प्रभूचे मार्ग सिद्ध करण्याकरिता तू त्याच्यापुढे' चालशील;

ह्यासाठी की, त्याच्या लोकांस त्यांच्या पापांच्या क्षमेने तारणाचा अनुभव द्यावा.

आपल्या देवाच्या परम दयेने हे झाले आहे;
तिच्या योगे उदयप्रकाश वरून आमच्याकडे येईल.

'ह्यासाठी की, त्याने अंधारात व मृत्युच्छायेत बसलेल्यांना प्रकाश द्यावा',
आणि आमचे पाय शांतीच्या मार्गी लावावे.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**जखऱ्याच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** प्रभू म्हणतो, 'हे मंदिर मोडून टाका, मी ते तीन दिवसांत उभारीन. तो तर आपल्या शरीररूपी मंदिराविषयी बोलत होता'.

## मध्यस्थीच्या प्रार्थना

प्रतिसाद: प्रभो, आम्हाठायी नवीन आत्मा उत्पन्न कर.

**आ**पल्याला तारणाचा दिवस पाहण्याचे भाग्य देणाऱ्या आपल्या मुक्तिदात्याला आपण धन्यवाद देऊ या. प्रतिसाद: प्रभो, आम्हाठायी नवीन आत्मा उत्पन्न कर.

**हे** ख्रिस्ता, तू आमचे जीवन आहेस. मरणातून पुन्हा उठण्यासाठी बाप्तिस्म्यामध्ये आम्ही तुझ्याबरोबर पुरले गेलो - आज आम्हाला नवजीवनाच्या मार्गाने चालव. प्रतिसाद: प्रभो, आम्हाठायी नवीन आत्मा उत्पन्न कर.

**हे** प्रभा, तू सर्वत्र बरे करीत फिरलास. - आम्हाला सार्वजनिक हितासाठी झटण्यास सहाय्य कर. प्रतिसाद: प्रभो, आम्हाठायी नवीन आत्मा उत्पन्न कर.

**पृ**थ्वीवरील नगर बांधण्यासाठी इतरांबरोबर सहकार्य करण्यास आम्हाला सहाय्य कर. - परंतु त्याचबरोबर तुझ्या स्वर्गीय राज्यावरून आमचे लक्ष कधीही विचलित होऊ देऊ नकोस. प्रतिसाद: प्रभो, आम्हाठायी नवीन आत्मा उत्पन्न कर.

**तू** शरीराचा आणि आत्म्याचा वैद्य आहेस.आमच्या जखमा बऱ्या कर - आम्हाला तुझ्या पावित्र्याची सर्व वरदाने मिळू देत. प्रतिसाद: प्रभो, आम्हाठायी नवीन आत्मा उत्पन्न कर.

आमच्या स्वर्गीय बापा ...

**समारोपाची प्रार्थना:**

हे परमेश्वरा, प्रार्थना, उपवास व दयाकृत्ये याच्या सामर्थ्याने पापावर विजय मिळविण्यास तू आम्हाला शिकविलेस. आमच्या दुर्बळतेमुळे आम्ही जेव्हा निराश होतो, तेव्हा तुझ्या दयेवरील आमची श्रद्धा ढळू देऊ नकोस. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.

(धर्मप्रांतीय उपासना आयोग फा. रॉबर्ट डिसोजा हयांच्या अथक परिश्रमाबद्दल तसेच सहाय्य करणा-या सर्वांचा ऋणी आहे.)